IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# 'ओल हरवलेली माती' कथासंग्रहातील आधुनिक शहरीवास्तव आणि मानवी एकाकीपण

**शोभा शंकर आवताडे (शोभा हणमंतराव मिसाळ)[1], भारती दिलीप रेवडकर(मार्गदर्शक)[2],**
प्राध्यापिका, मराठी विभाग, विलिंग्डन कॉलेज, सांगली, भारत[1]
प्राध्यापिका, मराठी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, भारत[2]

**सारांश** (Abstract) *: साहित्य आणि समाज यांचे नाते अत्यंत निकटचे असून समाजातील बदलांचे प्रतिबिंब साहित्यात उमटते. आधुनिक काळात शहरीकरण, तंत्रज्ञान आणि बदलती जीवनशैली यामुळे मानवी नातेसंबंध आणि व्यक्तीचे भावविश्व मोठ्या प्रमाणात बदललेले दिसते. आजच्या शहरी जीवनात भौतिक प्रगती असली तरी नात्यातील ओलावा कमी होतं चाललेला दिसून येतो. नीरजा यांच्या 'ओल हरवलेली माती' या कथासंग्रहातील विविध कथांमधून आधुनिक शहरी जीवनातील ताण, नातेसंबंधातील दुरावा आणि मानवी एकाकीपणा याचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. या कथांच्या आधारे आधुनिक शहरी वास्तव नातेसंबंधातील बदल आणि व्यक्तीच्या अंतर्मनातील एकाकीपणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार आहे.*

*मराठी साहित्यात जागतिकीकरण', खाजगीकरण आणि उदारीकरण यामुळे साहित्यात बदल झाला आहे. या कालखंडामध्ये सुबत्ता आली ,गरीबी हटली, लोकसंख्या वाढून बेरोजगारी वाढली आणि त्यात तरुण मुले भरडली गेली .मानवी नातेसंबंधातील कोरडेपणा, चंगळवादी वृत्ती बाजारीपणामुळे बदललेली नीतीमूल्ये याचे चित्रण साहित्यात आढळते .इंटरनेट व सोशल मीडियाचा प्रभाव साहित्यावर मोठ्या प्रमाणात असल्याने साहित्याची भाषा आणि स्वरूप बदलले.महानगरीय जीवनातील ताण -तणाव, मध्यमवर्गीय स्त्रीचे बदललेले भावविश्व ,एकाकीपण हेच कथेचे मुख्य विषय ठरले.*

**की - वर्ड** : 'ओल हरवलेली माती' कथासंग्रहातील आधुनिक शहरीवास्तव आणि मानवी एकाकीपण

## I. प्रस्तावना :

साहित्य आणि समाज यांचे नाते अत्यंत निकटचे असून समाजातील बदलांचे प्रतिबिंब साहित्यात उमटते. आधुनिक काळात शहरीकरण, तंत्रज्ञान आणि बदलती जीवनशैली यामुळे मानवी नातेसंबंध आणि व्यक्तीचे भावविश्व मोठ्या प्रमाणात बदललेले दिसते. आजच्या शहरी जीवनात भौतिक प्रगती असली तरी नात्यातील ओलावा कमी होतं चाललेला दिसून येतो. नीरजा यांच्या 'ओल हरवलेली माती' या कथासंग्रहातील विविध कथांमधून आधुनिक शहरी जीवनातील ताण, नातेसंबंधातील दुरावा आणि मानवी एकाकीपणा याचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. या कथांच्या आधारे आधुनिक शहरी वास्तव नातेसंबंधातील बदल आणि व्यक्तीच्या अंतर्मनातील एकाकीपणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार आहे.

मराठी साहित्यात जागतिकीकरण', खाजगीकरण आणि उदारीकरण यामुळे साहित्यात बदल झाला आहे. या कालखंडामध्ये सुबत्ता आली ,गरीबी हटली, लोकसंख्या वाढून बेरोजगारी वाढली आणि त्यात तरुण मुले भरडली गेली .मानवी नातेसंबंधातील कोरडेपणा, चंगळवादी वृत्ती बाजारीपणामुळे बदललेली नीतीमूल्ये याचे चित्रण साहित्यात आढळते .इंटरनेट व सोशल मीडियाचा प्रभाव साहित्यावर मोठ्या प्रमाणात असल्याने साहित्याची भाषा आणि स्वरूप बदलले.महानगरीय जीवनातील ताण -तणाव, मध्यमवर्गीय स्त्रीचे बदललेले भावविश्व ,एकाकीपण हेच कथेचे मुख्य विषय ठरले.

एकविसाव्या शतकातील मराठी साहित्यात ज्या लेखिकांनी स्त्री जाणीव आणि महानगरीय जीवनातील गुंतागुंत अत्यंत प्रगल्भपणे मांडली आहे .त्यामध्ये नीरजा यांचे नाव हे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांचा 'ओल हरवलेली माती' हा कथासंग्रह आधुनिक मानवी जगण्याचे विशेषतः शहरी जीवनातील विदारक वास्तवाचे दर्शन घडवणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आजचे युगे विज्ञानाचे, तंत्रज्ञानाचे आणि जागतिकीकरणाचे युग मानले जाते. माणसाने भौतिक प्रगतीची शिखरे पादाक्रांत केली असली तरी मनाच्या स्तरावर तो कमालीचा एकाकी झाला आहे. नीरजा यांच्या या कथासंग्रहातील प्रत्येक कथा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात याच मानवी एकाकीपणाचा आणि नात्यांमधील वाढत्या कोरडेपणाचा वेध घेते.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

नीरजा या अलीकडच्या काळातील एक महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, कविता लेखन केलेले आहे.'ओल हरवलेली माती' , 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' अस्वस्थ मी अशांत मी' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. तर नीरजा यांचे आजवर 'निरन्वय' , 'वेणा' , 'स्त्री-गणेशा' , 'निरर्थकाचे पक्षी' असे चार कवितासंग्रह प्रकाशित झाले असून त्यांच्या सर्वच संग्रहांना मान सन्मानाने आणि विविध पुरस्काराने गौरवलेले आहे. त्यांनी कवितेशिवाय कथा आणि स्तंभलेखन या क्षेत्रात ही भरीव कामगिरी केली आहे. 'बदलत्या चौकटी' , 'चिंतनशलाका' हे स्तंभलेखन संग्रह प्रसिध्द आहेत. एका कवयित्रीने जाणीवपूर्वक स्वतःच्या क्षमतांचा आणि शक्यतांचा विविध साहित्य प्रकाराच्या संदर्भात घेतलेला शोध म्हणजे त्यांचे हे कथात्मक लेखन होय. नीरजा यांनी विविध साहित्य प्रकारातून लक्षणीय लेखन केले आहे. त्यांनी कथांमधून स्त्रीच्या अन्य नातेसंबंधाचा एकंदरीनेच मानवी नातेसंबंधाचा सूक्ष्म मागोवा त्यांच्या कथामधून घेतला आहे.

'ओल हरवलेली माती 'या कथासंग्रहाचे शीर्षक अत्यंत प्रतिकात्मक आहे. 'माती'ही मानवी अस्तित्वाची नात्यांचे प्रतीक आहे तर 'ओल' ही जीवनापर्यंत संवाद आणि भावनिक उब दर्शवते. जेव्हा या 'ओल 'चा अभाव निर्माण होतो तेव्हा माती कोरडी पडते. त्याचप्रमाणे आधुनिक शहरी जीवनात नात्यातील उब कमी होत चालली आहे. या कथासंग्रहातील सुरुवातीच्या कथांमध्ये आधुनिक शहरी जीवनाचे वास्तव अत्यंत प्रभावीपणे मांडलेले आहे. या कथांमधील पात्रे शहरातील वेगवान ताणतणाव आणि स्पर्धात्मक जीवनात अडकलेली आहेत. या जीवनशैलीमुळे त्यांच्या भावनिक गरजा नातेसंबंध आणि मानसिक संतुलन यावर परिणाम होतो. परिणामी मानवी एकाकीपणाची जाणीव अधिक तीव्र होते. या संग्रहातील 'फतिमा' 'रत्नप्रभा जाधव' किंवा 'एकाकी सूर्य वितळताना ' मधील पात्रे असोत, ही सर्व पात्रे आपल्या अस्तित्वाचा शोध घेताना आणि नात्यामधील रितेपण भरून काढताना एकाकी पडताना दिसतात.

'मासा आणि आक्रमकता'या कथेत संवादाच्या अभावामुळे निर्माण होणारा एकाकीपणा अधोरेखित होतो. नवरा -बायको एकाच घरात राहत असतात परंतु त्यांच्या विचारांमध्ये आणि अपेक्षांमध्ये मोठी दरी आहे. नवऱ्याची पुरुषप्रधान मानसिकता आणि बायकोची जागरूकता यामुळे संघर्ष निर्माण होतो. संवादाचा अभाव हा या संघर्षाचे मूळ कारण ठरते. यातील दोघेही एकमेकांच्या जवळ असूनही भावनिकदृष्ट्या दूर आहेत. नातेसंबंधातील ताणतणाव हा आधुनिक शहरी वास्तवाचा भाग बनलेला आहे.

'तिच्या मुलीचा बाप' या कथेत वासंती आणि सुधाकर यांचे वैवाहिक नाते हे तणाव, हिंसा आणि मानसिक अस्थिरतेने व्यापलेले आहे. सुधाकरच्या वर्तनामुळे वासंतीचे जीवन असह्य बनते.येथे शहरी जीवनातील मानसिक आजार, ताण आणि असुरक्षितता स्पष्ट होते. या परिस्थितीत वासंती जरी कुटुंबात असली तरी ती भावनिकदृष्ट्या पूर्णपणे एकटी पडलेली दिसते .हा एकाकीपणा केवळ शारीरिक नसून मानसिक आणि भावनिक स्वरूपाचा आहे.

स्त्रीच्या जीवनातील एकाकीपणाचे अत्यंत प्रभावी चित्र 'निर्णय' या कथेत दिसून येते.या कथेतील अनु या पात्राला मूल होत नसल्यामुळे तिच्या वैवाहिक जीवनात दुरावा निर्माण होतो.अनुजा नवरा जयंत याला दत्तक मुल नकोय .स्वतःच्या हाडामासाचे मुल त्याला हवे आहे. त्यामुळे तो आईला म्हणतो की' तिला सोडून देऊ का? शहरी समाज आधुनिक असल्याचा दावा आपण करतो. परंतु स्त्रीचे मूल्यांकन अजूनही तिच्या मातृत्वाशी जोडलेले आहे. या सामाजिक दबावामुळे स्त्री मानसिकदृष्ट्या कोलमडते. अनुच्या जीवनातही हाच अनुभव आलेला आहे तिच्या वेदना समजून घेणारा कोणी नसल्यामुळे ती अधिकच एकाकी होते.

याच कथासंग्रहातील ' एकाकी सूर्य वितळताना' या कथेत 'विद्या' ही स्त्री पात्राच्या माध्यमातून एकाकीपणाचे सूक्ष्म चित्रण केलेले आहे. विद्या ही स्त्री समाजकार्यांमध्ये व्यस्त असली तरी तिच्या वैयक्तिक जीवनात भावनिक एकटेपणा जाणवतो. ती आपल्या कुटुंबीयांकडून अपेक्षा ठेवते मात्र त्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे तिच्या नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो.शेवटी ती स्वतःच्या चुका ओळखते ती स्वतःचे आत्मपरीक्षण करते यातून एकाकीपणा हा तिच्यासाठी आत्मजागृतीचा मार्ग ठरतो.

'गुंता' या कथेत कुटुंबातील विस्कळीतपणा आणि मुलांच्या वर्तनातील बिघाड यामुळे निर्माण होणारा सामाजिक आणि कौटुंबिक एकाकीपणा दिसून येतो. कुटुंबामध्ये संवादाचा अभाव ,मूल्याची कमतरता आणि चुकीचे निर्णय यामुळे संपूर्ण कुटुंब गोंधळात अडकते.गोंधळामुळे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती हे स्वतःच्या समस्यांमध्ये अडकते आणि एकामेकांपासून दूर जाते.

आधुनिक शहरी वास्तवाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे व्यक्तीच्या आयुष्यातील नोंदवा' माझ्या मित्राची गोष्ट' या कथेत जोसेफ हा समाजसेवा करतो ती करत असताना त्याला स्वतःच्या इच्छा पूर्ण करण्यास वेळ मिळत नाही या दोन्ही गोष्टी साध्य न झाल्यामुळे तो संघर्षात सापडतो. शहरी जीवनात यश,कर्तव्य आणि सामाजिक प्रतिष्ठा यांना महत्व दिले जाते परंतु व्यक्तीच्या भावनिक समाधानाकडे दुर्लक्ष होते त्यामुळे शहरी माणूस स्वतःच्या जीवनातच परका होतो. नीरजा यांनी बहिण- बहिण ,बहिण- भाऊ यांच्या नातेसंबंधाचा त्यातील ताणतणावांचा उल्लेख ही 'रत्नप्रभा जाधव वर्तमानपत्रातली बाई होते तेव्हा' या कथेतून केलेला आढळतो.


DOI: 10.48175/IJARSCT-37525

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

समारोप :

एकविसाव्या शतकातील शहरी जीवनाच्या पार्श्वभूमीवर नीरजा यांच्या ‘ओल हरवलेली माती’ या कथासंग्रहाचा अभ्यास करताना असे स्पष्टपणे जाणवते की, आधुनिकतेच्या प्रक्रियेमुळे मानवी जीवनात भौतिक समृद्धी वाढली असली तरी भावनिक स्तरावर मोठी पोकळी निर्माण झाली आहे.या कथासंग्रहातील विविध कथांमधून नातेसंबंधांतील ताणतणाव, संवादाचा अभाव, व्यक्तीच्या मनातील संघर्ष आणि एकाकीपणाचे वास्तवदर्शी चित्रण दिसून येते. विशेषतः स्त्रीच्या जीवनातील मानसिक वेदना, सामाजिक अपेक्षा आणि वैयक्तिक अस्तित्वाचा शोध हे विषय प्रभावीपणे मांडले गेले आहेत.नीरजा यांच्या कथालेखनातून केवळ समस्यांचे चित्रण होत नाही, तर त्या समस्यांच्या मुळाशी असलेल्या सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक घटकांचाही सूक्ष्म विचार आढळतो. त्यामुळे या कथा केवळ साहित्यिक दृष्ट्या महत्त्वाच्या नसून त्या समाजशास्त्रीय दृष्टीनेही अभ्यासासाठी उपयुक्त ठरतात.

एकंदरीत, ‘ओल हरवलेली माती’ हा कथासंग्रह आधुनिक शहरी जीवनातील नातेसंबंधांचे बदलते स्वरूप आणि मानवी एकाकीपणाचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो.

## II. निष्कर्ष :

शहरी जीवनातील वेग, स्पर्धा आणि ताणतणाव यामुळे नात्यांतील आत्मीयता कमी होत असून व्यक्ती अधिक एकाकी होत आहे.नातेसंबंधांतील तणावाचे प्रमुख कारण म्हणजे संवादाचा अभाव. यामुळे भावनिक दुरावा आणि गैरसमज वाढतात.स्त्रीचे मूल्यांकन अजूनही मातृत्व, वैवाहिक जीवन आणि सामाजिक अपेक्षांशी जोडलेले आहे. त्यामुळे तिच्या मानसिक स्थितीवर नकारात्मक परिणाम होतो.आधुनिक कुटुंबात मूल्यांची घट आणि भावनिक बांधिलकी कमी होत असल्यामुळे कुटुंबव्यवस्था कमकुवत होत आहे.एकाकीपणा हा केवळ शारीरिक नसून मानसिक, भावनिक आणि सामाजिक स्तरावर अनुभवला जातो.काही कथांमध्ये एकाकीपणा हा आत्मजागृतीचा आणि आत्मपरीक्षणाचा मार्ग ठरतो.भौतिक प्रगती असूनही मानसिक समाधानाचा अभाव ही आधुनिक जीवनाची प्रमुख विसंगती आहे.

## संदर्भसूची :

[१] नीरजा 'ओल हरवलेली माती ' पॉप्युलर प्रकाशन , मुंबई ,२००६.
[२] पाटील, आनंद,आधुनिक मराठी कथा : स्वरूप आणि समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे,१९९९
[३] जोशी, सुधा. साहित्य आणि समाज ,मौज प्रकाशन गृह,मुंबई ,१९८५
[४] देशमुख, अरुणा, स्त्रीवादी साहित्य समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर,२००२
[५] कुलकर्णी, द. दि. आधुनिक मराठी साहित्य प्रवाह , मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,१९९२
[६] विविध साहित्यिक नियतकालिकांतील नीरजा यांच्या कथांवरील समीक्षात्मक लेख
[७] आधुनिक मराठी कथासाहित्यावरील संशोधन निबंध

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/IJARSCT-37525